## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
(दुपार)

जा.क. ७३१/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २६/१०/२०१७

**१) निष्काळजीपणे वाहन चालवुन मोबाईलवर बोलतांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद:—**

दिनांक २५/१०/२०१७ चे २०.४० वाजता. दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे, धोकादयक पध्दतीने मोबाईलवर बोलतांनी वाहन चालविंताना मिळुन आला त्यास पोलीसांनी थांबविण्याचा इसारा केला परंतु तो,थांबला नसल्याने सरतर्फे फिर्यादी पोशी. गाढवे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम २७९ भादवी. सहकलम १८४,१३२,१७७,१७९,२५०(१)एमएमव्हीआर,१८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बावणे पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत.

**२) रात्रीच्या अंधारात दखलपात्र गुन्हा करण्याच्या उददे्शाने मिळुन आल्याने गुन्हा नोंद:—**

दिनांक २५/१०/२०१७ चे ००.५० ते ०१.५५ वाजता दरम्यान यातील आरोपी हा अंधारात त्याचे अस्तीत्व लपवुन दखलपात्र गुन्हा करण्याच्या बेतात मिळुन आल्याने, त्यास ताब्यात घेवुन पोलीस स्टेश्न तुमसर येथे कलम १२२ मपोका. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. मेसरे पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**३) सार्वजनीक ठिकाणी वाहन थांबवुन येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीस अडथडा व लोंकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करतांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक २५/१०/२०१७ चे १८.०० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील काळी पिवळी वाहन ही आम रोडवर येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल, अश्या स्थितीत वाहन उभी करतांनी मिळुन आल्याने, पोलीस स्टेशन पालांदुर येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. कोल्हे पो.स्टे. पालांदुर हे करीत आहेत.

**४) औषधोपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु. :—**

दिनांक २५/१०/२०१७ चे ११.३५ वाजता दरम्यान यातील मृतक दिलीप वारलु बन्सोड वय ३४ वर्ष, रा. कारधा याची प्रकृती बऱ्याच दिवसा पासुन बरी राहत नसल्याने त्यास औषधोपचारा करीता सा.रू. भंडारा येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने,फिर्यादी भुमीपाल धरमदास बंन्सोड वय ३४ वर्ष रा. कारधा यांचे लेखी व डॉ. मेमो वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मनगटे पो.स्टे कारधा हे करीत आहेत.

**४) गळफास लावुन इसमाचा मृत्यु . :—**

दिनांक २५/१०/२०१७ चे १३.००ते १३.३० वाजता दरम्यान यातील मृतक प्रकाश सत्यारी रासेकर वय ४० वर्ष, रा. मोहरणा हा फिर्यादीचा भाऊ असुन त्याचे डोक्यात फरक असल्याने वेडसर होता मृतकने घरी कोणीही हजर नसतांना वेडसर पणाच्या भरात घरी माज घरात दाव्याची दोरी पंख्याला बांधुन गळफास लावुन आत्महत्या केल्याने फिर्यादी मुरलीधर मारोती रासेकर वय ५५ वर्ष रा. मोहरणा यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोना. भोयर पो.स्टे लाखांदुर हे करीत आहेत.

**५) औषधोपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु . :—**

दिनांक २४/१०/२०१७ चे ४.३० वाजता दरम्यान यातील मृतक सुरेश दयाराम मडावी वय ४२ वर्ष, रा. गोलेवाडी हा त्याचे शेतातील गवत कापत असतांनी त्याचे डावे पायाला काहीतरी चावल्याने त्यास औषधोपचारा करीता सा. रू. भंडारा येथे भरती केले असता उपचारा दरम्याण मरण पावल्याने डॉ. मेमोवरून पो.स्टे. भंडारा येथे मर्ग क्र. ००/१७ कलम १७४ जाफौ. चे कागद पत्र पो.स्टेला प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. मस्के यांचे रिपोर्ट वरून वरून पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भोंगाडे पो.स्टे अडयाळ हे करीत आहेत.

७) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :

दिनांक २५/१०/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ११० प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी तीन सिटर वाहनांवरती १४ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ९६ केसेस करण्यात आले आहे.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता